# ‘पाणीदार’ करमाळ्यासाठी बागलांचा भाजपासोबत ‘सेतू’

## रिटेवाडी सिंचन योजनेच्या अभिवचनाने आशा पल्लवीत

### ▶▶ सावंतशाहीच्या मार्चेबांधणीवर पाणी
### ▶▶ मंत्री तानाजी सावंतांना धक्का

✔ सुराज्य/करमाळा

करमाळा तालुक्याच्या राजकारणातील प्रबळ गट असलेल्या बागल गटाने ‘कमळ’ हातात घेऊन पिढ्यानपिढ्याचा दुष्काळी असा कलंक पुसून पाणीदार करमाळ्यासाठी जणू भाजपासोबत सेतू बांधला. या तालुक्यातील साधारण ४० ते ४५ गावात जलसिंचनातून समृध्दीची पहाट उगवण्यासाठी वरदान ठरणाऱ्या रेटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या पूर्णत्वासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवचन दिल्याने या तालुक्यातील संबंधित गावच्या नागरिकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

विशेषत्वे, तालुक्यातील विकास कामे करण्यासाठी त्यातूनही गटाचे प्राबल्य कायम राहण्यासाठी ऊर्जावान ताकद बागल गटाला हवी होती. ती भाजपा प्रवेशाने मिळाल्याचे मानले जात आहे. बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल-कोलते आणि दिग्विजय बागल यांनी कोणतीही अट न घालता प्रवेश केला, त्याचे वेगळे प्रतिबिंब भाजपात उमटले. शिवाय यामुळे या पक्षातील श्रेष्ठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे या गटाच्या नेत्यांबद्दल वेगळीच सहानभूती आणि वजन निर्माण झाल्याचे मानले जात आहे.

करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसा सिंचन योजना साकारण्यासाठी ज्या काही अडचणी आहेत, त्या दुर करु अशी बागल गटाला उपमुख्यमंत्र्यांनी दिलेली ग्वाही या गटाची ताकद वाढविणारी आहे. ही योजना प्रत्यक्ष साकारल्यास बागल गटाचे या तालुक्यात राजकारण अधिक भक्कम होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यात या गटाच्या शिवसेनेचा विस्तार होण्यासाठी मंत्री प्रा. तानाजी सावंत हे प्रयत्नशील आहेत. त्यांच्याकडून तशी मोर्चेबांधणी सुरु आहे. बागल गटालादेखील सावंत यांनी ऊर्जा देत भक्कम करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यातून हा गट मुख्यमंत्री शिंदे शिवसेना गटात सामील होईल, असे अपेक्षित होते. तसा प्रयत्नदेखील मंत्री सावंत यांचा होता.

मात्र, झाले वेगळेच. भाजपाने येथे सुरुंग लावला. बागल गटाच्या हातात ‘कमळ’ दिले. भाजपाने चेकमेट केला.

#### रश्मी दीदी आप बहुतही आगे बडो
#### प्रवेशापाठोपाठ दोन पदांची गिफ्ट

रश्मी बागल-कोलते यांनी भाजपामध्ये प्रवेश करताच त्यांना या पक्षाने ऊर्जा दिली. भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या हस्ते निवडीचे पत्र त्यांना देण्यात आले. शिवाय माढा लोकसभा मतदार संघाची प्रभारी म्हणूनदेखील जबाबदारी देण्यात आली.






#### खासदार नाईक-निंबाळकरांचे एका दगडात दोन पक्षी

माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी करमाळ्याचा बागल गटाचा भाजपात प्रवेश घडवून आणला. हे खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच प्रवेशावेळी जाहीररित्या सांगितले. करमाळा तालुक्यातील सामर्थ्यवान बागल गटाला भाजपात आणून श्री नाईक-निंबाळकर यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडील वजन वाढविले. शिवाय खासदारकीसाठी या गटाची ताकद मिळविण्याचा मार्ग सुकर केला. त्यांनी एका दगडात दोन पक्षी मारले.

#### सोलापुरात शिंदे गटाच्या शिवसेनेलाच सुरुंग

राज्याच्या सत्तेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा गट सहयोगी म्हणून आहे. या गटालाच सुरुंग लागण्याचा प्रकार भाजपाकडून झाला. वास्तविक बागल गट हा एकनाथ शिंदे शिवसेना गटात नव्हता पण विरोधातही नव्हता. मंत्री सावंत यांच्या मध्यस्तीने हा गट शिंदे शिवसेना गटात येणार हे अपेक्षित होते. मात्र, तसे झाली नाही. या गटाने थेट भाजपात प्रवेश केला. बागल गटाने चार वर्षात शिवसेनेला जय महाराष्ट्र करुन भाजपाचे ‘कमळ’ हाती घेतले.

#### संघर्षशील नेतृत्वाचे उपमुख्यमंत्र्यांकडून कौतुक

भाजपाप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रश्मी बागल-कोलते यांचे संघर्षशील नेतृत्व असा उल्लेख करीत त्यांचे कौतुक केले. स्व.दिगंबर बागल यांच्या निधनानंतर रश्मी यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत बागल गटाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवले.याबद्दल त्यांनी कौतूक करत भाजपामध्ये प्रवेश केल्याने चिंता करण्याचे कारण नाही. भाजपा हा पक्ष आहे, तसे कुंटुंब आहे. कुंटुंबातील प्रत्येक सदस्याची चिंता करणे, काळजी घेणे ही आमची जबादारी आहे. रश्मी बागल-कोलते यांच्यासह बागल गटातील सर्वांची काळजी आम्ही घेऊ, असे अभिवचन देत श्री फडणवीस यांनी त्यांना आश्वस्त केले. बागल गटासाठी फडणवीस यांचे हे शब्द खूप उभारी देणारे आहेत, असे मानले जाते.



## मंद्रुपचे राजेश देशमुख राष्ट्रवादीत दाखल

### उपमुख्यमंत्री पवार, प्रदेशाध्यक्ष तटकरे यानी केले स्वागत

✔ सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुपचे धनगर समाजातील सर्वमान्य समाजसेवक डॉ. राजेश बळवंतराव देशमुख यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत प्रवेश केला.राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांनी देशमुख यांचे पक्षात स्वागत केले.

राष्ट्रवादीचे सोलापूर शहर अध्यक्ष संतोष पवार आणि दक्षिण सोलापूर राष्ट्रवादीचे नेते डॉ.बसवराज बगले यांच्या पुढाकारातून डॉ.देशमुख यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

देवगिरी बंगल्यात मंगळवारी सायंकाळी देशमुख यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यांच्या समवेत इंजिनियर व्यंकटेश कोटा आणि शंकर कुलकर्णी यांनीही राष्ट्रवादी प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार राजेश देशमुख यांना सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पक्षाशी एकनिष्ठ राहून निष्ठापूर्वक काम करण्याची सूचना केली.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघाची स्थिती याबाबत राष्ट्रवादीचे नेते डॉ.बगले यांनी माहिती दिली. संतोष पवार यांनी देशमुख यांचे योगदान निश्चितच फायदेशीर ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे, प्रदेश राष्ट्रवादीचे कोषाध्यक्ष गर्जे, सोलापूर राष्ट्रवादीचे सरचिटणीस प्रमोद भोसले,दशरथ शेंडगे,सोमनाथ शिंदे,युवक नेते सुहास कदम,विशाल बंगाळे आदी उपस्थित होते.

## कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान : डॉ.पवार

✔ सुराज्य/सोलापूर

मराठी भाषा ही मूळ आर्यांची भाषा आहे. साधारण दिडशे वर्षांपूर्वीचा इतिहास जपणारे ही भाषा आहे. मराठी भाषा ही भारताच्या दक्षिण भागांमध्ये विकसित झाली आहे त्यामुळे ही भाषा आता एका वेगळ्याच टप्प्यावर येऊन पोहोचली आहे असे मत डॉ मधुकर पवार यांनी व्यक्त केले.



छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ भवन दमानी नगर सोलापूर यांच्या संयुक्त विधमाने आयोजित केलेल्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा नागनाथ नवगिरे होते.

मराठी भाषा ही ज्ञानगंगा आहे. आपणाला खरंच ज्ञान घ्यायचे असेल तर मराठी भाषेशिवाय पर्याय नाही. कुसुमाग्रज हे मानववादी कवी आहेत मराठी भाषेला अभिजात दर्जा का मिळत नाही हे त्यांनी वेगवेगळे संदर्भ देऊन सांगितले. कवी कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये बहुलाचे योगदान दिले आहे असे ते म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ युवराज सुरवसे, प्रा. डॉ.अरुण मित्रगोत्री, प्रा. डॉ.अभिमन्यू ओहोळ प्रा. डॉ. अरुण सोनकांबळे, प्रा. डॉ. वाल्मीक कीर्तीकर, प्रा. डॉ. राणी मोटे, प्रा. डॉ. हिरांचद्र मोरे, तिपन्ना करजगी नागनाथ स्वामी, तळभंडारे, डोळणारे, होमकर, नंदकुमार भोसले, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार सौ तळभंडारे यांनी मांडले.

## ‘सेतू’च्या तक्रारदारांची सत्यता पडताळून पहा

### ▶▶ शासनाचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील बारा सेतू कार्यालयांसाठी ऑनलाइन निविदा प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने झाल्याची तक्रार छत्रपती संभाजीनगर येथील जे. एम. के. इन्फोटेक सोल्युशन कंपनीने राज्य शासनाकडे केली आहे. याप्रकरणीची सत्यता पडताळून पहा असे पत्र जिल्हाधिकारी यांना शासनाने पाठवले आहे. त्यानुसार चौकशी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले.

बारा सेतू कार्यालयांसाठी एकूण सात निविदा आल्या. यापैकी ३ निविदा तांत्रिक कारणास्तव अपात्र ठरल्या. उर्वरित चारपैकी दोन निविदा अंतिम करून त्यांना मक्ता देण्यात आला आहे. टेरा सॉफ्टवेअर कंपनीकडे अक्कलकोट, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, बार्शी, माढा, तसेच गुजरात इन्फोटेक कंपनीकडे माळशिरस, पंढरपूर, सोलापूर शहर, करमाळा, सांगोला, मोहोळ येथील सेतू कार्यालयांचा मक्ता देण्यात आला आहे. यातील टेरा कंपनीचा मक्ता रद्द करण्यात आला. उर्वरित इतर दोन कंपन्यांना डावलून गुजरात इन्फोटेक कंपनीला सर्व सेतू कार्यालयांना मक्ता दिल्याने इतर दोन कंपन्या नाराज झाल्या आहेत.

जिल्ह्यातील बारापैकी सहा सेतू कार्यालयांचा मक्ता हैदराबाद येथील टेरा सॉफ्ट कंपनीला मिळाला होता. जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार कंपनीने १८ लाख रुपये डिपॉझिट भरले. कंपनीच्या विरोधात काहींनी आक्षेप घेतला. टेरा कंपनीला ब्लॅक लिस्टचे कारण देत गुजरात इन्फोटेक कंपनीला बाराही सेतू कार्यालयांचा मक्ता देऊन टाकला. प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात टेरा कंपनी आक्रमक झाली असून, याप्रकरणी कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे, तसेच इतर मक्तेदारांनी शासनाकडे तक्रार केली. टेरा कंपनीचा मक्ता रद्द केल्यानंतर इतर मक्तेदारांना सेतू कार्यालये देणे गरजेचे असताना नियमबाह्य पद्धतीने एकाच कंपनीला सर्व सेतू कार्यालये दिल्याची तक्रार करण्यात आली.

## जिल्ह्यातील मराठा कुणबी जात प्रमाणपत्र

### दोन दिवसात एक हजार प्रमाणपत्र वाढले तीन हजार प्रमापत्राचे वाटप; ४५ अर्ज नामंजूर; ३८० प्रलंबित

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात २८ फेब्रुवारीपर्यंत ५८ हजार १२४ नोंदी आढळून आल्या आहेत. प्रशासनाकडून जात प्रमाणपत्र तपासणीला गती दिली जात आहे. दोन दिवसात दिड हजार प्रमानपत्र वाढले आहेत. आज आखेर तीन हजार २४ प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. तर ४५ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. ३८० प्रलंबित ठेवण्यात आले आहेत अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

राज्यात कुणबी मराठा नोंदी पडताळणी करण्यात येत आहे. त्याचे अपडेट दर आठवड्याला प्रत्येक जिल्हा प्रशासनाकडून राज्य सरकार कडे विभागिय आयुक्तांच्या माध्यमातून पाठवला जात आहे. २८ फेब्रुवारी रोजी जिल्हाप्रशासनाकडून सादर करण्यात आलेल्या आकडेवारी नुसार मराठा कुणबी तपासलेल्या नोंदी आणि वाटप केलेल्या आवाहला नुसार ५८ हजार १२४ तपासणी मध्ये नोंदी आढळून आल्या आहेत. तर ५७ हजार नोंदी स्कॅनिक केल्या आहेत. तर ३९ हजार ९४४ नोंदी शासनाच्या सर्केत स्थळावर अपलोड केल्या असल्याने नागरिकाना पाहता येणार आहेत.

तालुका निहाय आकडेवारी अशी

| नाव | आढळेल्या नोंदी | वाटप | प्रलंबित |
|---|---|---|---|
| उत्तर सोलापूर : | २३ | ०० | ०० |
| बार्शी : | १६३१५ | १७०८ | ०३ |
| दक्षिण सोलापूर : | २० | ०२ | ०० |
| अक्कलकोट : | ४७ | ३१ | ०३ |
| माढा : | ११६४८ | ५४३ | ०० |
| करमाळा : | २१८७४ | २७२ | ०० |
| पंढरपुर : | ३५२३ | १८३ | १९ |
| मोहोळ : | १६६६ | १७३ | ३१३ |
| मंगळवेढा : | ८५ | ०० | ०० |
| सांगोला : | ११६ | ०५ | ०० |
| माळशिरस : | २७८७ | १०७ | १५ |

बार्शी तालुक्यात सर्वाधिक १७०८ प्रमाणपत्राचे वाटप झाले त्यानंतर माढ्यामध्ये ५४३ दाखले वाटप केले गेले आहेत. तर मोहोळ तालुक्यातील ३१३ अर्ज प्रलंबीत ठेवण्यात आले आहेत.

यासाठी १९६७ पूर्वीच्या नोंदी तपासल्या जात आहेत. या नोंदी तपासताना जवळपास १३ प्रकारची कागदपत्रे विचार घेतला जात आहे.

यामध्ये शाळा सोडल्याचा दाखला, सातबारा व ८ अ चा उतारा, जन्म मृत्यूच्या नोंदी, खरेदी - विक्री दस्त, कढई पत्रक, ग्रामपंचायत व महसूल दप्तरी असलेला खसरा पत्रक, पाहणी पत्रक, कुळ नोंदवही, हक्क नोंदणी, पोलीस विभागातील गुन्हा दप्तरी नोंद, हक्क नोंदणी, रेल्वे पोलीस विभागातील गुन्हा दप्तरी नोंद, शेतवार तक्ता आदींचा समावेश आहे. संस्थानचे रेकॉर्ड देखील विचारात घेतले जात आहे.

## विवाहित तरुणाचा झोपेत संशयास्पद मृत्यू

✔ **सोलापूर** : शेत जमिनीच्या वादातून मारहाण झाल्यानंतर एका विवाहित तरुणाने घरात जाऊन झोपी गेला. त्यानंतर त्याचा झोपेतच मृत्यू झाला. ही घटना कामती खुर्द (ता.मोहोळ) येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. आनंद महादेव शिंदे (वय ३५ रा. कामती खुर्द ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे. काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास कामती येथील सिद्राम राठोड यांच्या दुकानासमोर शेतीच्या वादातून त्यांचा भाऊ दयानंद शिंदे आणि इतर तिघांनी मिळून त्यांना मारहाण केली होती. त्यानंतर ते घरी जाऊन झोपले होते. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्यांना उठवले असता ते बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यानंतर त्यांना रात्री लखन कुलसागर (नातेवाईक) यांनी सोलापूरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. मयत आनंद शिंदे यांच्या पश्चात पत्नी,१ मुलगा आणि१ मुलगी असा परिवार आहे. ते एसटीमध्ये ड्रायव्हर म्हणून कामास होते. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली. पुढील तपास कामती पोलीस करीत आहेत.

## जुनी लक्ष्मी चाळ येथे अखंड हरिनाम सप्ताह

✔ **सोलापूर** : महाशिवरात्री निमित्त जुनी लक्ष्मी चाळ (डोणगाव रोड सोलापूर) येथील श्री महादेव मंदिरात २ ते ९ मार्चपर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व श्री राम कथेचे आयोजन केले आहे, अशी माहिती ह.भ. प. ज्योतीराम महाराज चांगभले (प्रदेश अध्यक्ष अखिल भाविक वारकरी मंडळ) यांनी दिली. यामध्ये दुपारी २ ते ५ रामायणाचार्य ह. भ. प.दत्तात्रय महाराज भोसले यांची राम कथा होणार आहे व रात्री ८ ते १० ह .भ. प. निळोबा महाराज शिरसट, ह. भ. प. संजय महाराज पाटील, ह. भ. प. सुधाकर महाराज इंगळे, ह. भ.प.ज्ञानेश्वर महाराज चव्हाण, ह. भ. प. हरिभाऊ महाराज शिंदे, ह. भ. प. अभिमन्यू महाराज डोंगरे, ह. भ. प. श्रीगुरु गुरुजीबुवा राशिनकर महाराज पंढरपूर, ह. भ. प. बजरंग महाराज डांगे यांची हरीकिर्तने होणार आहेत. या हरिनाम सप्ताहामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील नामवंत गायक, मृदंग वादक, टाळकरी, वारकरी, सेवेधारी, भाविक मंडळी उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त




### राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला पिलीव शहराध्यक्षपदी पुनम भैस

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी ग्रामपंचायत सदस्या पुनम भैस यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला पिलीवच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यांना नुकतेच निवडीचे पत्र राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा महीला अध्यक्षा वर्षाराणी शिंदे यांच्याहस्ते व माजी आ. दिपक साळुंखे पाटील, ऋतुजा मोरे आदींच्या उपस्थितीत देण्यात आले. निवडीनंतर भैस यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडणार असल्याचे सांगितले.




### मारुती बावडे यांना ग्रामीण पत्रकारितेतील पुरस्कार प्रदान

✔ **अक्कलकोट** : मुंबई येथील सप्ततारांकित हॉटेल आयटीसी मराठा येथे द हिंदुस्थानी पिलर ऑफ सोसायटी या देशपातळीवरील पुरस्कार सोहळ्यात मारुती बावडे यांना ग्रामीण पत्रकारितेतील द पिलर ऑफ हिंदुस्तानी सोसायटी हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पद्मश्री उदय देशपांडे,रशियन फेडरेशनचे कॉन्सुल लेक्सी कालुगिन,डिशनल डायरेक्टर जनरल फॉरीन ट्रेडचे डॉ.आर.के. मिश्र, ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे आंतरराष्ट्रीय सहअध्यक्ष प्रविण लुंकड, कॉन्सुल जनरल, न्यूझीलंडचे ग्रॅहॅम रूस,कॉन्सुल जनरल,तुर्कीयचे जुनैद यावुझकान, हिंदुस्तानी शाखा,ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष डॉ.मोहम्मद अली पाटणकर, आणि कार्यकारी अध्यक्ष, ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे सुकांत डोळे,डॉ.वैशाली भिडे,ओमानचे अलबलुशी,बांगलादेशचे चिरंजीब सरकार,चिलीचे गुस्तावो गोंझालेज,श्रीलंकेचे शिरानी अरिरत्ने,डॉ.उदय निरगुडकर,डॉ.ए.डी सावंत आदी मान्यवरांची उपस्थिती होती. बावडे यांना आतापर्यंत राज्यस्तरीव आणि जिल्हास्तरीय पुरस्कार अनेक मिळाले आहेत.



### अक्कलकोटमध्ये नुतन तहसिलदारांचा ईसेवाकेंद्र संघटनेकडून सत्कार

✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट तहसील ऑफिस येथे नव्याने पदभार घेतलेले तहसीलदार विनायक मगर यांचा सत्कार अक्कलकोट तालुका महा-ई-सेवा केंद्र संघटनेतर्फे श्री स्वामी समर्थांची मूर्ती शाल श्रीफळ व हार व गुच्छ देऊन करण्यात आला.या प्रसंगी संघटनेचे तालुकाध्यक्ष स्वामीनाथ धनशेट्टी, सिद्धाराम जकापुरे, सुनील इसापुरे, राजेश यादव, गणेश पोतदार, वैजनाथ बंदीछोडे, यल्लप्पा निंबाळकर, वीरेश जोळद, नजीर मुल्ला व इतर महाईसेवा केंद्रचालक उपस्थित होते.

### चार मार्च रोजी लोकशाही दिन

✔ **सोलापूर** : जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी सांगितले. दिवशी जनतेच्या तक्रारीबाबत संबधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी उपस्थित रहावे. तसेच मागील महिन्यातील प्रलंबित अर्ज, निवेदने, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकारवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही आदी माहितीसह संबधितांनी वेळेत उपस्थित रहावे. तसेच सदर दिवशी गैरहजर राहणार असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे असेही निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

### अल्पवयीन तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : आई रागावल्याच्या किरकोळ कारणावरून एका अल्पवयीन तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली . ही घटना बीबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. नंदिनी मनोज व्हनमाने (वय १६ रा. बीबीदारफळ) असे आत्महत्या केलेल्या अल्पवयीन तरुणीचे नाव आहे. काल रात्री ९ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरातील पहिल्या मजल्यावर असलेल्या खोलीत छताच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून घरातील लोकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली.आई रागावल्याच्या कारणावरून तिने हा प्रकार केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली. हवालदार स्वामी पुढील तपास करीत आहेत.

### ‘खुशाल चेंडू’ बालकथासंग्रहास अक्षर सागर साहित्य पुरस्कार प्रदान

✔ **बार्शी** : आबासाहेब घावटे लिखित ‘खुशाल चेंडू’ या बालकथासंग्रहास अक्षर सागर साहित्य मंचाचे अध्यक्ष डॉ.मा.ग. गुरव यांच्याहस्ते अक्षरसागर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप होते. भुदरगड (जि कोल्हापूर) या ठिकाणी हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. माजी आ. बजरंग देसाई, डॉ. किरण गुरव, दीपक मेंगाणे, अक्षर सागर साहित्य मंचाचे सचिव बा.स जठार, उपाध्यक्ष डी.व्ही.कुंभार आदी उपस्थित होते. आबासाहेब घावटे यांच्या ’खुशाल चेंडू ’या बालकथा संग्रहास मिळालेला हा पहिला पुरस्कार आहे.